लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा १८ नोव्हेंबरला वर्धापनदिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापनदिन दि. १८ नोव्हेंबर (गुरुवार) रोजी साजरा होणार आहे. या कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित असणार आहेत.



मृणालिनी फडणवीस

विद्यापीठात सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन आणि त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात पावणेनऊ वाजता वर्धापन दिनाचा कार्यक्रम सुरू होईल.

12 NOV 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनातील सर्वच उपकरणे समाजाभिमुख व्हावीत

## कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के; एक्सआरडी कार्यशाळेस विद्यापीठात प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील संशोधन केंद्रातील सर्वच उपकरणे समाजाभिमुख व्हावीत, यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले.

विद्यापीठातील डीएसटी-सैफ सुविधा केंद्रात 'स्ट्राईड' योजनेंतर्गत आयोजित दोन दिवसीय एक्सआरडी कार्यशाळेस गुरुवारपासून सुरुवात झाली. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डीएसटीचे सल्लागार डॉ. एस. एस. कोहली, सैफ केंद्र पंजाब विद्यापीठाचे डॉ. चौधरी व सैफ केंद्र आयआयटी मुंबईचे डॉ. कोट्टनथरायील यांची ऑनलाईन उपस्थिती होती.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'एक्सआरडी' कार्यशाळेचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. सोबत डॉ. आर.जी. सोनकवडे, डॉ. के.डी. सोनवणे, डॉ. आर.के. कामत आदी.**

डॉ. कोहली यांनी 'डीएसटी'कडून राबवण्यात येणारे वेगवेगळे उपक्रम व उपलब्ध होणारा निधी याबद्दल माहिती दिली. 'सैफ' सुविधा केंद्राचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यशाळा आयोजनाचा हेतू सांगितला. आयआयटी मुंबईच्या डॉ. कोट्टनथरायील व पंजाब विद्यापीठाचे डॉ. एस. ए. सैनी यांनी आयआयटी मुंबई व पंजाब विद्यापीठातील सैफ आणि तेथील उपलब्ध उपकरणांची माहिती दिली. शुक्रवारी (दि. १२) रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. भांगे पदार्थाच्या विश्लेषणासाठी त्याचा अधिक प्रभावीपणे कसा वापर करता येईल, याबद्दल मार्गदर्शन करणार आहेत.

### दहा कोटींहून अधिक रक्कम

संशोधकांना त्यांच्या संस्थांमध्ये अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी 'डीएसटी'कडून सैफ (एसएआयए) ची सुरुवात करण्यात आली. राज्य विद्यापीठात असणारी एकमेव 'सैफ' शिवाजी विद्यापीठातील सुविधा केंद्रात आहे. 'डीएसटी'ने विद्यापीठास सैफ केंद्रासाठी दहा कोटींहून अधिक रक्कम दिली आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा १८ रोजी वर्धापनदिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापनदिन येत्या गुरुवारी (दि. १८) सकाळी ८.४५ वाजता राजश्री शाहू सभागृह येथे साजरा करण्यात येणार आहे. सकाळी साडेआठ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. याप्रसंगी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक तसेच संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य,



शिक्षक व प्रशासकीय सेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ.पी.जी.पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरविले जाणार आहे. प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्राप्त विभाग व उत्कृष्ट अधिविभागांना पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

12 NOV 2021 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवाने कलेचे व्यासपीठ निर्माण केले : गुरव

## एकदिवसीय युवा महोत्सव कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवा महोत्सवाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कलाकार घडवले आहेत. भविष्यकाळात अडचणी व नैराश्यावर मात करण्यासाठी युवा महोत्सवाची ऊर्जा जीवनास आनंददायी बनवते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कोल्हापूर जिल्हा एकदिवसीय युवा महोत्सव कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. कार्यशाळेत जिल्हा विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. डी. जी. चिघळीकर यांनी अभिनयाबरोबरच नाट्यलेखन तंत्र, नेपथ्य, गीत साथ, नृत्याविष्कार, संवाद, भाषण कौशल्यबाबत माहिती दिली.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय युवा महोत्सव कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी.**

मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक नीलेश सावे यांनी कलेची माध्यमे व सादरीकरणाविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी गायन, वादन, संगीत, वेस्टर्न साँग, लोकगीते अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करून ताल, सूर, वाद्य व संगीताविषयीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. कार्यशाळेसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी आभार मानले.

पुढारी

# पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात रोहित कांबळे यांचा सत्कार

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विभागीय माहिती संचालक कार्यालयातील छायाचित्रकार रोहित कांबळे यांचा शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : प्रा. डॉ. एम. एस. देशमुख व अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या हस्ते रोहित कांबळे यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.**

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन कांबळे यांना गौरविण्यात आले. यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते. कांबळे हे पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विद्यार्थी आहेत. छायाचित्रांबरोबरच लघुपट, संहितालेखन, चित्रीकरण आदी क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. महापुराच्या काळात रोहित यांनी काढलेले छायाचित्र शासनाच्या 'लोकराज्य' नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर प्रकाशित झाले होते.

पुढारी

# सत्र परीक्षा प्रक्रिया; आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या हिवाळी सत्रातील परीक्षेसाठी महाविद्यालये, अधिविभागात शुक्रवार (दि.१२) पासून अर्ज प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे. विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार १२ ते २६ नोव्हेंबर विनाविलंब शुल्क, २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत विलंब शुल्क व त्यानंतर ४ ते ७ डिसेंबरपर्यंत अतिविलंब शुल्काने अर्ज करता येणार आहे.

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. अंतिम प्रबंध सादर करण्यापूर्वी प्रमाणपत्राची पूर्तता आवश्यक

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून एम.फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी अंतिम प्रबंध सादर करण्यापूर्वी रिसर्च पब्लिकेशन व पेपर प्रेझेंटेशन इन कॉन्फरन्स, सेमीनारबाबत प्रमाणपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे. यूजीसी, नवी दिल्ली यांच्या एम.फिल., पीएच.डी.संदर्भात ५ मे ,२०१६ रोजीच्या नोटिफिकेशननुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने केलेल्या नियमावलीनुसार रिसर्च पब्लिकेशन व पेपर प्रेझेंटेशन इन कॉन्फरन्स, सेमीनारबाबत शिवाजी विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे नियमावली लागू केली आहे. जे विद्यार्थी प्रमाणपत्राची पूर्तता करणार नाहीत, त्यांचा अंतिम प्रबंध स्वीकारला जाणार नाही, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

# समस्यांचे निराकरण करणारे खरे नेतृत्व

## कुलगुरू डॉ. शिर्के; डॉ. श्रावस्तींच्या पुस्तिकेचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : कोणताही उद्योग-व्यवसाय हा पैसा मिळविण्यासाठी किंवा नफ्यासाठी नसतो. तो नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उभारले जात असतात. याची जाणीव असणारे नेतृत्वच सच्चे असते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काल येथे व्यक्त केले. विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या स्व. रा. ना. गोडबोले अध्यासनातर्फे पुण्याच्या सिंहगड कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स येथील वाणिज्य अधिविभाग प्रमुख डॉ. राजू श्रावस्ती लिखित 'लीडरशीप इन बँकिंग सेक्टर : चेंजिंग सिनॅरिओ इन ट्वेंटी फर्स्ट सेंच्युरी' या संशोधन पुस्तिकेच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''बँकिंग क्षेत्रातील नेतृत्वाच्या सर्वंकष वाटचालीचा संशोधनात्मक आढावा घेऊन त्याचे पुस्तिका रूपाने प्रकाशन करण्याचा अध्यासनाचा उपक्रम स्तुत्य आहे. ज्ञाननिर्मितीच्या अशा अधिकाधिक वाटा शिक्षक, संशोधकांनी चोखाळल्या पाहिजेत. खऱ्या नेतृत्वाचा कस पाहणाऱ्या अनेक बाबी असतात. बँकिंग क्षेत्रात संपत्ती निर्मिती आणि संपत्ती व्यवस्थापन या दोन बाबी उत्तम नेतृत्वाचा परिपाक असतात.''



कोल्हापूर : पुस्तक प्रकाशन समारंभात डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. महाजन आदी.

### तीन शून्यांचा विचार

डॉ. शिर्के म्हणाले, ''ग्रामीण बँक उपक्रमाचे उद्गाते व जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ मुहम्मद युनूस यांनी तीन शून्यांचा विचार करण्याचे आवाहन जगाला केले आहे. त्यामध्ये शून्य गरिबी, शून्य बेरोजगारी आणि शून्य प्रदूषण यांचा समावेश आहे. या तीन शून्यांसाठी जी व्यवस्था काम करते, त्या व्यवस्थेचे नेतृत्व खरे असे मानायला हवे.''

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''अपयशातून भरारी घेण्याची क्षमता असणाऱ्या नेतृत्वाची जागतिक स्तरावर आज वाखाणणी केली जाते. अशा लोकांकडेच कंपन्या नेतृत्व सोपवतात. त्यामुळे नेतृत्व यश किती मिळविते यापेक्षाही आस्थापनेला अपयशातून कसे सावरते. यावर त्याची महत्ता निर्धारित होत असते.''

कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्या हस्ते संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन झाले. संशोधक लेखक डॉ. राजू श्रावस्ती यांनी पुस्तिकेमधील विश्लेषणाची माहिती दिली. अध्यासन प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा १८ ला वर्धापन दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन गुरुवारी (ता. १८) साजरा होत आहे. सोलापूर येथील अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख पाहुण्या असून, राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम होईल. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन होणार आहे.

सकाळ



# संशोधक विद्यार्थ्यांना सेमिनार प्रमाणपत्र आवश्यक

कोल्हापूर : एम. फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी अंतिम प्रबंध सादर करण्यापूर्वी रिसर्च पब्लिकेशन व पेपर प्रेझेंटेशन इन कॉन्फरन्स सेमिनारबाबत प्रमाणपत्र पूर्तता करणे आवश्यक आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातर्फे पत्रकाद्वारे प्रसिद्धीस देण्यात आली आहे. यूजीसीच्या सूचनेनुसार हा नियम लागू केला आहे. जे विद्यार्थी याची पूर्तता करणार नाहीत. त्यांचा अंतिम प्रबंध कार्यालयाकडून स्वीकारला जाणार नाही. याची संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

सकाळ

# उद्यानांच्या मेंटेनन्सकरिता ई-निविदा प्रक्रिया

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठातील उद्यानांच्या मेंटेनन्सकरिता ई-निविदा प्रक्रिया सुरू झाली असून, २३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा व मानव्यशास्त्र, डॉ. अप्पासाहेब पवार पुतळा व गेस्ट हाऊस, डॉ. बापूजी साळुंखे पुतळा, तंत्रज्ञान वसतिगृह व डीओटी, भाषा भवन, फिजिक्स व केमिस्ट्री डिपार्टमेंट उद्यानांकरिता ही निविदा प्रसिद्ध केली आहे. ही उद्याने विद्यापीठाच्या लौकिकात भर घालणारी आहेत. त्याचा अभिमान विद्यापीठात येणाऱ्या प्रत्येकाला आहे. विशेष म्हणजे नॅकच्या मूल्यांकनासाठी येणाऱ्या समितीकडूनही विद्यापीठाच्या हिरव्यागार परिसराचे कौतुक होते. उद्याने नीट-नेटकी ठेवण्यासाठी विद्यापीठातील कर्मचारी वर्ग दक्षता घेतो. विविध प्रजातीचे वृक्ष उद्यानात पाहायला तर मिळतात. शिवाय रंगीबेरंगी फुलांनी उद्याने नटतात. या उद्यानांच्या मेंटेनन्सकरिता ई निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, http:/unishivaji.sets.co.in संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन केले आहे. अर्ज २३ नोव्हेंबरला दुपारी साडेतीनपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

12 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सैफ केंद्रातील वैज्ञानिक उपकरणे समाजाभिमुख व्हावी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठातील एक्सआरडी कार्यशाळेचे उद्घाटन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) विद्यापीठास सैफ केंद्रासाठी दहा कोटीहून अधिक रक्कम दिली. त्यातून एक्सआरडी, टीइएम यांसारखी वैज्ञानिक उपकरणे घेतली आहेत. त्यांचा उपयोग विद्यापीठ परिसर, संलग्न महाविद्यालयातील संशोधकांना होत आहे. कोल्हापूर सैफ केंद्रातील सर्वच उपकरणे समाजाभिमुख व्हावीत, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

डीएसटी आणि शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रात 'स्ट्राइड' योजनेअंतर्गत आयोजित दोन दिवसीय एक्सआरडी कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते.

डीएसटीचे सल्लागार डॉ. एस. एस. कोहली यांनी डीएसटाचे उपक्रम, निधी याबद्दल माहिती दिली. संशोधक संस्थांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सैफ सुविधा केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यशाळेचा उद्देष सांगितला. सैफ केंद्र पंजाब विद्यापीठाचे डॉ. चौधरी, आयआयटी मुंबईच्या डॉ. कोट्टनथरायील, पंजाब विद्यापीठचे डॉ. एस. ए. सैनी यांनी सैफ आणि तिथल्या उपकरणांची माहिती दिली. ब्रूकर कंपनीचे ॲप्लिकेशन इंजिनियर डॉ. रविकुमार यांनी एक्सआरडी उपकरणाची प्रात्यक्षिके दाखवली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित एक्सआरडी कार्यशाळेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. आर. के. कामत आदी.**

### सैफबाबत थोडक्यात...

महाराष्ट्रातील राज्य विद्यापीठात असणारी एकमेव सैफ ही शिवाजी विद्यापीठातील सुविधा केंद्रात आहे. संशोधकांमध्ये त्यांच्याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि तंत्रज्ञांसाठी उपकरणांची देखभाल, दुरुस्ती आणि विश्लेषणात्मक तंत्रांचा यावर सैफ नियमितपणे अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणात्मक कार्यक्रम आयोजित करत असते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन १८ रोजी


प्रतिनिधी
कोल्हापूर

## ▪ सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा वर्धापन दिन गुरुवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या सोहळयासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस आहेत. तर प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत.

ध्वजावंदनाने या कार्यक्रमाला सुरुवात होईल. त्यानंतर सत्काराचा कार्यक्रम मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात होईल. तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक, सेवक, कर्मचारी आदींनी उपस्थित राहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.





या सोहळयात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव, होणारस आहे.

तरुण भारत

# 'युजीसीच्या नियमानुसार एम. फिल., पीएच. डी. शोधप्रबंध सादर करावा'

कोल्हापूर : एम. फिल., पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांनी किती संशोधन पेपर प्रसिध्द करावे, कार्यशाळांमध्ये किती पेपर सादर करायचे यासंदर्भात युजीसीने नियम व अटी जाहिर केल्या आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांनी युजीसीच्या नियमानुसार शोधप्रबंध सादर करावा, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत. विद्यापीठांतर्गत मराठी, इंग्रजी, हिंदी, भुगोल, इतिहास, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र यासह जवळपास ३८ विषयांमध्ये शेकडो विद्यार्थी एम. फिल., पीएच. डी. करतात. या विद्यार्थ्यांनी शोधप्रबंध सादर करताना कोणत्या नियम व अटी पूर्ण केल्या पाहिजेत, यासंर्भात ५ मे २०१६ रोजी युजीसीकडून नियमावली जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी या नियमावलीचे पालन करावे, अशा सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.